# 'प्रकल्प साहाय्यक(Project Fellow)' ह्या पदासाठी जाहिरात'

मराठी विभागातील एक सहयोगी प्राध्यापक डॉ. तुकाराम रोंगटे ह्यांनी यु.जी.सी. नवी दिल्ली ह्यांच्या अनुदानातून **'मराठी कादंबरीने चितारलेली आदिवासी स्त्री ः शोध आणि बोध'** हा बृहत् शोधप्रकल्प **१.०७.२०१२** ते **३०.०६.२०१४** ह्या कालावधीसाठी हाती घेतला आहे. ह्या कालावधीतील एक वर्षासाठी त्यांना दरमहा रू १४,०००/- ह्या पगारावर 'प्रकल्प साहाय्यक' ह्या पदावरील एक 'संशोधन साहाय्यक' नेमावयाचा आहे. त्यासाठीची पात्रता पुढीलप्रमाणे ः

१. शिक्षण ः एम.फिल. मराठी किंवा एम.ए. गुण कमीत कमी ५५ टक्के

( एस.सी./एस.टी./अपंग हयांच्यासाठी कमीतकमी गुण ५० टक्के)

२. वयोमर्यादा ः ४० वर्षे किंवा ४० वर्षाहून कमी.

३. तांत्रिक ज्ञान ः संगणक, टंकलेखन,इंटरनेट आदी तांत्रिक गोष्टींचे ज्ञान

४. अभ्यासक्रम ः **मराठी कादंबरी, समीक्षा, संशोधन, आदिवासी संस्कृती आणि साहित्य या बाबतचे ज्ञान**

पात्र व इच्छुक उमेदवारांनी साध्या कागदावर अर्ज लिहून त्यासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडावीत व पुढे दिलेल्या तपशिलानुसार मुलाखतीस अर्ज घेऊन हजर रहावे. मुलाखतीबद्दलचा तपशील पुढीलप्रमाणे ः

मुलाखतीचा दिवस व वेळ ः शुक्रवार, दि. ७ डिसें. २०१२, वेळ दुपारी १२.००वा.

मुलाखतीचे स्थळ ः मराठी विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे- ०७

| | | |
|---|---|---|
| डॉ.(कॅप्टन)सी.एम.चितळे | डॉ.विद्यागौरी टिळक | डॉ.तुकाराम रोंगटे |
| प्रभारी कुलसचिव | प्राध्यपक व प्रमुख | मुख्य शोधक (Principal Investigator) |
| पुणे विद्यापीठ, पुणे | प्राध्यापक व प्रमुख, मराठी विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७. | सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे-४११ ००७. |